# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. ३७५/२०१९ दिनांक ३१/१०/२०१९**

## " राष्ट्रीय एकता दिना निमित्त दौड रॅली "

दिनांक ३१. ऑक्टोबर, २०१९ रोजी सरदार वल्लभभाई पटेल, यांच्या जयंती दिनानिमित्त नांदेड पोलीस दलाचे वतीने, **" राष्ट्रीय एकता दिना निमित्त दौड रॅली" Run for unity** काढण्यात आली असुन सदर रॅली ही गांधी पुतळयास पुष्पहार अर्पण करुन महात्मा गांधी पुतळा ते जुना मोंढा टॉवर येथे जाऊन, सरदार वल्लभाई पटेल, यांच्या पुतळयास **मा. विजयकुमार मगर,** पोलीस अधिक्षक नांदेड, **मा. लहुराज माळी,** आयुक्त मनपा, **मा. दत्तराम राठोड**, अपर पोलीस अधिक्षक, **मा. डॉ. सचिन कलाल,** निवास उपजिल्हाधिकारी, यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. तसेच पोलीस दलाचे वतीने सलामी देवुन बँड पथकारवर राष्ट्रगीत वाजण्यात येवुन मानवंदना देण्यात आली. व राष्ट्रीय एकता दिनाची शपथ घेण्यात आली. सदर रॅलीमध्ये अंदाजे एकुण ५०० अधिकारी व कर्मचारी यांनी सहभाग घेतला होता. देशभक्तीपर गाणी बँडपथकाद्वारे वाजविण्यात आली.

तसेच हा दिवस "**स्व. इंदिरा गांधी** "यांचा पुण्यतिथी असल्याने त्यानिमित्त **" राष्ट्रीय संकल्प दिवस"** म्हणुन पोलीस अधिक्षक कार्यालयात साजरा करण्यात आला. पोलीस अधिक्षक कार्यालयात **सरदार वल्लभभाई पटेल,** यांची जयंती आणि **स्व. इंदिरा गांधी** यांची पुण्यतिथी निमित्त यांचे प्रतिमेस **मा. ए.डी. जहरवाल,** पोलीस उप-अधिक्षक (मु), यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. या प्रसंगी **पोनि डोईफोडे,**स्थागुशा, **पोनि श्री. साळुंखे**, नियंत्रण कक्षक, **सपोनि/श्री अण्णासाहेब पवार,** जनसंपर्क अधिकारी, **सपोनि/श्री. विश्वांभर पल्लेवाड,** नियंत्रण कक्ष नांदेड. तसेचे इतर पोलीस अधिकारी व कर्मचारी स्थानिक गुन्हे शाखा, जिवीशा, नियंत्रण कक्ष, महिला सहाय्य कक्ष, कार्यालयीन कर्मचारी मोठया संख्येने हजर होते. तसेच जनसंपर्क कार्यालयाचे पोहेकॉ/सुर्यभान कागणे, मपोकॉ/सुप्रिया सगर हे हजर होते.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४.


३१ ऑक्टोबर २०१९
"सरदार वल्लभभाई पटेल जयंती निमित्त"
"राष्ट्रीय एकता दिवस" "राष्ट्रीय एकता दौड"
: राष्ट्रीय एकता दौडचा मार्ग :
आरंभ ठिकाण : राष्ट्रपिता महात्मा गांधी पुतळा
ते सरदार वल्लभभाई पटेल पुतळा, जुना मोंढा टॉवर येथे समारोप




कार्यालय, नांदेड
मर्यादित,मुंबई यांच्या मार्फत बांधण्यात आलेल्या नुतन वास्तुचा
अध्यक्ष